www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 25 शुक्रवार दि. 03 ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

## अंभोरा फाट्यावर एस.टी. बसथांबा मंजूर – खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी : बाळासाहेब रकटाटे**

अंभोरा फाटा (ता. आष्टी, जि. बीड) येथील ग्रामस्थांना दिलासा देणारी मोठी बातमी – अखेर अंभोरा फाटा येथील एस.टी. बसथांब्याला शासनाची मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने अधिकृत आदेश काढत बसथांबा मंजूर केला आहे.

या निर्णयासाठी बीड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार मा. बजरंग बाप्पा सोनवणे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे ग्रामस्थांची जुनी मागणी पूर्ण झाली आहे. अंभोरा येथील ग्रामस्थांनीही सातत्याने खासदार साहेबांकडे पाठपुरावा केल्यामुळे हे काम तातडीने मार्गी लागले.




विशेष म्हणजे, या कामासाठी खासदारांच्या स्वीय साहेबांनी थेट अंभोरा फाटा येथे थांबा मिळण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून प्रशासनाशी समन्वय साधला. ग्रामस्थांची मागणी उच्च स्तरावर पोहोचवून प्रकरण वेगाने मार्गी लावण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला.

या निर्णयामुळे अंभोरा ग्रामस्थांसह नांदूर, सालेवडगाव, सुलेमान, देवळा आदी पंचक्रोशीतील प्रवासी, शेतकरी व विद्यार्थी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. विद्यार्थी आता शिक्षणासाठी सहजपणे अहमदनगर येथे प्रवास करू शकतील. तसेच अहमदनगर येथे दवाखान्यात उपचारासाठी जाणाऱ्या जेष्ठ नागरिकांना व ग्रामस्थांना मोठी सोय होणार आहे. ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुकर होणार असून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व नागरिकांच्या आरोग्य उपचारांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरलेल्या या निर्णयाबद्दल विद्यार्थ्यांच्या व जेष्ठ नागरिकांच्या वतीने खासदार बजरंग बाप्पा सोनवणे व संबंधित अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत.

ग्रामस्थांचा निर्धार – "अंभोरा फाटा बसथांबा हा आमच्या संघर्षाचा आणि जनप्रतिनिधींच्या प्रयत्नांचा यशस्वी पुरावा आहे."

खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या पाठपुराव्यामुळे अहिल्यानगर–पिंपरखेड ही बस सुरू करण्याचे आदेशही निघाले आहेत. त्यामुळे परिसरातील गावांनी खासदार साहेबांचे आभार मानले आहेत.

खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की – "जनतेच्या सोयीसाठी व

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ खारघर येथे शताब्दी वर्ष श्री विजयादशमी उत्सव भव्यदिव्य संपन्न

**दैनिक युवक आधार**
**खारघर/आण्णासाहेब आहेर**

(दि. २ ऑक्टोबर २०२५)- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेच्या शताब्दी वर्षानिमित्त व श्री विजयादशमी उत्सवाच्या औचित्याने खारघर येथे अभूतपूर्व उत्साहात भव्य सोहळा संपन्न झाला. गुरुवार दि.२,ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल मैदान, सेक्टर १९ येथे हा सोहळा पार पडला, हजारो स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध उपस्थितीने आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागाने मैदान भारावून गेले.




पारंपरिक उपक्रमांचा भव्य आविष्कार:
उत्सवाची सुरुवात झेंडावंदनाने झाली. त्यानंतर प्राचीन परंपरेनुसार शस्त्रांचे पूजन करण्यात आले,स्वयंसेवकांनी दिलखुलास आवाजात सांघिक गीत व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची प्रार्थना सादर केली. अमृतवचनांचे वाचन आणि पंच परिवर्तन विषयावरील मार्गदर्शनाने कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण झाला.

**अखंड भारत व पंच परिवर्तन रांगोळी देखावा:**
कार्यक्रमस्थळी साकारण्यात आलेली अखंड भारताची रांगोळी सर्वांचे विशेष आकर्षण ठरली. भारताच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वैभवाचे दर्शन घडविणारी ही रांगोळी समाजातील एकात्मतेचा संदेश देणारी ठरली. त्याचबरोबर पंच परिवर्तन संकल्पनेवरील देखाव्याने संघाच्या सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय बांधिलकीचे प्रतिबिंब दाखविले.

**सर्वधर्मभावातून विश्वगुरू भारताचा संदेश:**
**संघाच्या शताब्दी उत्सवात वक्त्यांनी स्पष्ट केले की** –
"जाती, वर्ण, पंथ,धर्म यांचा भेदभाव विसरून सर्वधर्मभावातून संघटित झालेला भारतच विश्वगुरू होऊ शकतो." समाजाच्या सर्व स्तरातील बांधवांचा या उत्सवात सहभाग असल्याने एकात्मतेचे चित्र अधिक प्रभावी दिसून आले.

संघाची स्थापना व ऐतिहासिक कार्य:या उत्सवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांच्या कार्यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला.



सन १९२५ मध्ये नागपूर येथे संघाची स्थापना करताना त्यांनी समाजातील सर्व घटकांना राष्ट्रहितासाठी संघटित करण्याचा संकल्प व्यक्त केला होता. गेल्या शंभर वर्षांत संघाने समाजातील विविध क्षेत्रांमध्ये कार्य करत राष्ट्रीय जीवनात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे, हे स्मरण उत्सवातून झाले

आजच्या घडीला भारतभरात १ लाख ३२ हजार नोंदणीकृत संघ शाखा सक्रिय असून,लाखो स्वयंसेवक रोजच्या शाखेतून शारीरिक,बौद्धिक आणि सामाजिक संस्कार जोपासत आहेत.समाजसेवा,शिक्षण, पर्यावरण संवर्धन,आपत्ती व्यवस्थापन, ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रांत संघ स्वयंसेवक कार्यरत आहेत. खारघर येथील उत्सवाने या व्यापक कार्याचे दर्शन घडविले

विजयादशमी हा दिवस तप, साधना व शक्तीचे प्रतीक असल्याचे अधोरेखित करत, वक्त्यांनी सांगितले की –
"प्राचीन परंपरेतून प्रेरणा घेऊन आपण आधुनिक समाजासाठी नवे आदर्श निर्माण करायचे आहेत.
विजयादशमी ही केवळ परंपरेची आठवण नाही तर एकात्म विश्वगुरू भारत घडविण्याचा प्रेरणादायी क्षण आहे."या सोहळ्यासाठी खारघर व आसपासच्या परिसरातील हजारो नागरिक, महिला,युवक व बालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध संचलनाने आणि सांघिक घोषवाक्यांनी वातावरण भारावून गेले. नागरिकांनीही या प्रसंगी देशभक्तीची अनोखी अनुभूती घेतली.

खारघर येथे झालेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी वर्ष श्री विजयादशमी उत्सव हा केवळ पारंपरिक उपक्रमांचा सोहळा न राहता समाजात संस्कार,शिस्त,समरसता आणि राष्ट्रभक्तीचा दीप प्रज्वलित करणारा पर्वणीसमान कार्यक्रम ठरला.















# पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वर विश्वास ठेवा

## अतिवृष्टीचे नुकसान भरपाई मिळणार | सावरगाव दसरा मेळावा-पंकजा मुंडे!

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी: मारुती सत्रे**

**सावरगाव -** भगवान भक्तिगड येथील दसरा मेळाव्यात पंकजा मुंडे यांनी हुल्लडबाजी करणाऱ्या कार्यकर्त्यांना चांगलेच झापले.तुम्ही असं वागणार असाल तर मला कठोर व्हावे लागेल. हुल्लडबाजी करणारे माझे लोक असू शकतं नाहीत.अगोदर भगवान गडावरील माझा मेळावा हिरावून घेतला. आता येथील मेळावा देखील तुम्हाला बंद पाडायचा का असा सवाल करते मुंडे यांनी कार्यकर्त्यांना समज दिली.

सावरगाव येथे आयोजित दसरा मेळाव्यात पंकजा मुंडे यांच्यासह धनंजय मुंडे,महादेव जानकर,प्रीतम मुंडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

भगवान गडाचा दसरा हिरावून घेतला, आता हा मेळावाही तुमच्या हातून हिरावला जाणार का?"असा थेट सवाल करत त्यांनी आपली भीती आणि नाराजी व्यक्त केली."माझ्या मेळाव्यात संपूर्ण राज्यातून लोक येतात.मी कुणालाही बोलावले नाही,तुम्ही स्वतः आला आहात.मग अशा वेळी गैरवर्तन का? तुम्ही माझी माणसं नाही."असा ठाम संदेश त्यांनी दिला.

**"हा फाटक्या माणसाचा मेळावा आहे!"**

पंकजा मुंडेंनी आपल्या भाषणात सांगितलं,"तुमचं भगवान बाबांवर खरं प्रेम असेल,तर असं वागणं अपेक्षित नाही. हा शोभेचा मेळावा नाही हा फाटक्या माणसांचा,संघर्ष करणाऱ्यांचा आणि गोपीनाथ मुंडेंचा वारसा जपणाऱ्यांचा मेळावा आहे."शायरीतून त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत."विरासत में संघर्ष मिला है,तो जिद भी मिली है लड़ने की"अशा शायरीद्वारे त्यांनी आपल्या संघर्षशील प्रवासाची आठवण करून दिली.




**पंतप्रधान मोदी आणि फडणवीस यांच्यावर विश्वास**

पंकजा मुंडेंनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांची अवस्था पाहून वेदना व्यक्त केल्या. त्यांनी स्पष्ट केलं की,"मी प्रधानमंत्री मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावतीने शब्द देते शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभं राहू. पूर्ण मदत केली जाईल."

**जातीपातीवर मात,माणुसकीचा धागा**

पंकजा मुंडेंनी विविध समाजातील लोकांच्या घरांमध्ये जाऊन केलेली मदत उधृत करत सांगितलं,"मी बौद्ध समाजातील व्यक्तीकडे गेले,तर वंजारा समाजाचा माणूस राशन घेऊन गेला. कैकाडी समाजालाही मदत केली यातून जाती गळून पडत आहेत.माणुसकीचं नातं जुळतंय."

**भगवान बाबांचा संदेश,स्वाभिमानाने जगा**

भाषणाच्या शेवटी पंकजा मुंडेंनी भगवान बाबांचा दाखला देत सांगितलं,"दोन घास कमी खा,पण स्वाभिमानाने जगा. कुणाचे तुकडे उचलू नका. खोटे धंदे करू नका. चांगल्या माणसाचं चांगलं होतं. भगवान बाबांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत."

## धारावीतील जय भवानी क्रीडा मंडळ तर्फे आरोग्य व मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**मुबंई:(दत्ता खंदारे)**

सुवर्ण महोत्सव वर्षाकडे वाटचाल करणारे धारावीतील जय भवानी क्रीडा मंडळ नवी चाळ, संत कक्कया मार्ग येथे नवरात्र उत्सवानिमित्त विभागातील लोकांची गरज व आवश्यकता ओळखून मंडळातर्फे मोफत आरोग्य तपासणी करुन उत्तर विभाग शास्त्रीनगर दवाखाना टीमचे प्रमुख डॉक्टर मेहुल व सी एच व्ही टीम यांच्यातर्फे विनामूल्य औषधे वाटप करण्यात आली. याचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला. त्यानंतर यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्या माध्यमातून जतन फाउंडेशन टीमने स्थानिक लोकांची डोळ्याची तपासणी करुन किमान १२५लोकांना विनामूल्य चष्माचे वाटप करण्यात आले. याकरिता कार्यक्रम प्रमुख श्रीमती दीपिका शेरखाने यांचे सहकार्य लाभले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष गिरीराज शेरखाने,सामाजिक कार्यकर्ते श्री दिलीप गाडेकर, श्री मंजुनाथ शेरखाने, श्री गौतम वटकर,श्री लतेश शेरखाने यांनी संपूर्ण व्यवस्था व सेवा देण्याचे कार्य पार पाडले.



# श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये दांडिया कार्यक्रम उत्साहात साजरा .




**दैनिक युवक आधार**
**लातूर/मोहम्मद पिंजारी**

मुरुड परिसरातील नामांकित असणाऱ्या व कै. गोरोबा ( काका) झाडके यांच्या ध्येयपूर्तीने वाटचाल करणाऱ्या श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये आज नवरात्री उत्सवा निमित्त दांडिया कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .

संस्थेचे अध्यक्ष श्री दिपक झाडके , सचिव प्रा. दत्तात्रय जाधव व कोषाध्यक्ष प्रा. शंकरराव पाटील यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम घेण्यात आला .

सर्वप्रथम महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या कुलस्वामीनी आई तुळजा भवानीच्या प्रतीमेचे पुजन संस्थेच्या सदस्या श्रीमती अश्विनीताई झाडके व रामेश्वरी झाडके यांच्या हस्ते करून देवीची आरती करण्यात आली . यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक बाबू थॉमस , उपमुख्याध्यापक उमेश कुंभार , समन्वयक रामेश्वर शेटे होते .

त्यानंतर देवीच्या नऊ रुपाचा महिमा सादर करून त्यांची विविध रुपेही सादर केली गेली . यावेळी शाळेतील सर्व मुली व मुलांनी विविध गितावर दांडिया नृत्य सादर केले . आपला जोडीदार तसेच आपला गट यांच्या माध्यमातून त्यांनी या नृत्यचा मनमुराद आनंद ही घेतला . सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीदेवी माशाळकर यांनी केले .

सदरील कार्यक्रमास शाळेतील प्रशांत कुलकर्णी , उमेश मारकड ,आदित्य सिंग , देवेशकुमार साहू यांच्यासह गीता फेरे , वैशाली देशमुख , बबीता गिरी , शांती मार्डी , क्लेरम्मा जेकप , अर्चना पाटील , ज्योती वांगसकर , महादेवी देशमुख , ज्योती ढेकणे , रेश्मा कुंभार , संध्या माळी , आकांक्षा लोमटे, श्रद्धा शितोळे , तृप्ती काळे , जयश्री जाधव , पौर्णिमा जाधव , रुचिता इरपतगिरे , संगीता बिटले , अश्विनी नाडे , प्रगती कुंभार , रोहिणी कासार, बबिता सिंग , प्रिया बोराडे , सन्ना पठाण , संगीता नाईक , जीशा मॅडम , वैष्णवी जगताप आदी शिक्षक / शिक्षीका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

सर्व विद्यार्थी या नृत्य कार्यक्रमाने आनंदून गेले होते . त्यांची वेशभुषा , केशभुषा व विविध गाण्यांवर धरलेला ताल यामुळे सर्व वातावरण अगदी प्रसन्नमय झाले होते .

## भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचे तालुकास्तरीय कबड्डी मध्ये दैदीप्यमान यश

**दैनिक युवक आधार**
**.रिसोड प्रतिनिधी. रणजितसिह.ठाकूर**

..... वाशिम जिल्ह्यातील आदर्श व रिसोड तालुक्यातील एकमेव मुलींचे भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय एक उपक्रमशील महाविद्यालय म्हणून नावलौकिक असलेले. नेहमीच तालुका जिल्हा विभागीय स्पर्धेमध्ये अग्रगण्य असलेल्या अशा भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी आज दिनांक 1ऑक्टोबर रोजी याचं गोळे श्री. ज्ञा.च. स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामध्ये किरण कैलास पवार (कप्तान) वैष्णवी डीडरकर (उप – कप्तान ), पुनम सदार,किरण सदार, संजीवनी धांडे, कार्तिकी गव्हाणे, पायल शिंदे, प्रतीक्षा खरात, प्रियंका ढोले,आणि सरिता खंडारे या सर्व विजयी स्पर्धक विद्यार्थीनीचे आणि विशेष करून अष्टपैलू विद्यार्थिनी कु. किरण कैलास पवार हिचे व मार्गदर्शक शिक्षक प्रा. पंजाब पानझाडे या सर्वांचे अभिनंदन व स्वागत कौतुक महाविद्यालयाच्या प्राचार्या आदरणीय मंजुषा सु.देशमुख मॅडम व




गोळे कनिष्ठ महाविद्यालय केनवड तालुका रिसोड येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी श्री. ज्ञा. च. गोळे कनिष्ठ महाविद्यालय केनवडच्या विद्यार्थिनींचा पराभव करत विजेतेपद वटकावले आहेत. व तालुकास्तरीय स्पर्धेतून जिल्हास्तरिय कबड्डी पर्यवेक्षक आदरणीय सुनील डहाळके सर तसेच सर्व प्राध्यापक- प्राध्यापिका, शिक्षक - शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी या वरील सर्वांनी अभिनंदन कौतुक करत पुढील जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा दिनांक 8 ऑक्टोबर रोजी पर्वतीबाई राठोड कन्या विद्यालय मंगरूळपीर येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी त्यांना अनंत अगणिक शुभेच्छा दिल्या.

# माझं गाव – आठवणींच्या गाभाऱ्यात

**लेखक : अजय पांडुरंग कापरे**

गाव... हे फक्त मातीचं नाव नाही, तर हृदयात जपलेल्या आठवणींचं, माणुसकीच्या नात्यांचं आणि परंपरेच्या सुवासाचं जिवंत रूप आहे.

आजही डोळे मिटले की पंचवीस वर्षांपूर्वीचं माझं गाव नजरेसमोर येतं. त्या काळी गावात काही मोठाले वाडे होते. ते वाडे म्हणजे जणू गावाचं वैभव. गावात सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदायचे. बारा बलुतेदारांच्या पद्धतीमुळे गावाचं जगणं समृद्ध आणि रंगतदार होतं.

गावातील प्रत्येक सण–उत्सव, प्रत्येक कार्यक्रम सामूहिक भावनेनं साजरा व्हायचा. "हर हर महादेव"चा घोष झाला की लगेच "शेख महमद महाराज की जय" हा जयघोष गुंजायचा. ही खरी ऐक्याची ताकद होती.

**गावाला लागून काही वस्ती होत्या.**

गावातील खिल्लारे मनोजच्या वाड्यातलं नारळाचं झाड कदाचित त्या काळातलं एकमेव नारळाचं झाड होतं. तुराफ भाईंच्या दारातलं मोठं लिंबाचं झाड, आणि समोर जिल्हा परिषद शाळेचं पटांगण – हे मुलांच्या आनंदाचं केंद्र होतं. गोट्या, विटीदांडू, लगोरी असे कितीतरी खेळ इथे रंगायचे. खेळण्यात इतका उत्साह असायचा की भूक लागली तरी जाणवायची नाही. तहान लागली तर वेशीत विशाल नालकोलच्या चहाच्या हॉटेलमधलं थंडगार पाणी मिळायचं – त्या काळी पाण्याचा घोटही सुखदायी वाटायचा.

आम्ही वस्तीवर राहायचो, पण सुट्टीच्या दिवशी दिवसभर गावात खेळायला जायचो. रात्री गावातील पुरुष मंडळी आणि मुले महादेवाच्या पारावर झोपायची. गप्पा, गोष्टी आणि हशा यांच्यात दिवस संपायचा. पहाटे महादेवाच्या मंदिरातील भोंग्यावर लागलेलं भक्तिगीत नवीन दिवसाची सुरुवात सुंदर करून टाकायचं.

गावातल्या बायकांचंही दैनंदिन जीवन रंगतदार होतं. पाणी भरायला गेलेल्या हपश्यावर अधूनमधून भांडणं व्हायची, पण ती क्षणापुरतीच. सकाळी भांडलेल्या बायका संध्याकाळपर्यंत परत गोड बोलू लागायच्या. संध्याकाळी मारुतीच्या मंदिरातील हरिपाठाने संपूर्ण गाव भक्तिमय व्हायचं.

हिवाळ्यात मंगाच्या चोपणावर अर्ध्या गावाची ज्वारी आणि हरभऱ्याचे खळे रचलेले असायचे. गावकरी आपापल्या खळ्यांची राखण करत चांदण्याखाली झोपायचे. त्या रात्रींना एक वेगळीच मजा असायची. म्हातारी माणसं त्यांच्या काळातील किस्से सांगायची, आणि आम्ही मुलं कान टवकारून ऐकायचो. महमा आणि प्रभा फरांडे ही जोडी गावात "करण–अर्जुन" म्हणून ओळखली जायची. एखाद्याला गंमतीत "येड्यात" काढायचं, हे त्यांचं खास कौशल्य होतं.

ते दिवस खरंच खूप सुंदर होते. पण आता गाव बदललंय. आज मोबाईलच्या आहारी गेलेली मुलं मैदानी खेळ विसरली आहेत. मोठ्यांचा आदर कमी झाला आहे. गावातील आळ्या ओस पडल्या आहेत. नोकरी–व्यवसायासाठी लोक शहराकडे जाऊ लागलेत. जुन्या वाड्यांचे पडके चौकटे, मोडकळीस आलेल्या भिंती आजही वाट पाहतायत –

ज्यांच्या पिढ्या त्या घरात वाढल्या, ती उडालेली पाखरं पुन्हा गावाकडे परत येतील का?

त्या पडलेल्या भिंती पुन्हा नव्यानं उभ्या राहतील का?

गाव बदललं, पण मनातल्या आठवणी मात्र अजूनही ताज्याच आहेत.

गावाच्या धुळीत, त्या चांदण्याखाली आणि त्या गोड गप्पांमध्ये अजूनही माझं बालपण जगतोय...




स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आज धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने पनवेल येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले. त्याचप्रमाणे भारतीय बौद्ध महासभा तालुका पनवेल चे अध्यक्ष सुनील कांबळे यांच्या हस्ते महेश साळुंखे यांचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भवन येथे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.. त्यावेळी पनवेल विधानसभा मतदार संघाचे पक्षाचे अध्यक्ष निलेश कांबळे त्याचबरोबर शेतकरी कामगार पक्षाचे मागासवर्गीय सेलचे पनवेल तालुका अध्यक्ष सचिन कांबळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

( दैनिक युवक आधार )

**दैनिक युवक आधार**
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR**
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# मी थोड्या दिवसाचा पाहुणा -मनोज जरांगे पाटील!

**दैनिक युवक आधार**
बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे

नारायणगड –आरक्षण भेटलं आहे,आता मागे हटू नका,मी किती दिवसाचा पाहुणा आहे माहित नाही,पण समाजासाठी मी सतत लढलो अन जिंकलो असं म्हणत मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दसरा मेळाव्यात भावनिक भाषण केले.



नारायणगड येथे आयोजित करण्यात आलेल्या दसरा मेळाव्यात जरांगे पाटील यांच्यासह मठाधीपती शिवाजी महाराज यांची उपस्थिती होती.

“मला बोलण्यास त्रास होत आहे. मला जशी मला ताकद मिळाली,तशी शेतकऱ्यांना मिळावी.पाच ते सहा महिन्यांपूर्वी मी तुम्हाला एक गोष्ट सांगितली की,‘मी थोड्या दिवसांची पाहुणा आहे.’आपण मुंबईला हाक दिली. कारण,मी बोललो की,शेवटी शरीर आहे. मला गरिबांच्या लेकरांचं आयुष्य करू द्या.मुंबईला चला.मी आहे तोपर्यंत माझ्या समाजातील लेकरांना आरक्षण दिलेले मला पाहायचं आहे. कुणी मागे हटू नकू सरकू नका.. तुम्ही आता साथ दिली,तर लेकरांचं कल्याण करू शकलो.तुम्ही साथ आणि जीआर जिंकून आलो.”

**मी कधीही नाटक केले नाही**

“मी आता थोड्या दिवसांचा पाहुणा असो किंवा खूप दिवसांचा मला आता त्याची चिंता नाही. जीवनात येऊन सिद्ध करायचे होते, ते मी केले आहे.गरीब मराठा समाज खूप होरपळत होता.तो होताना मला बघवत नव्हते. मी कधीही नाटक केले नाही.समाजाला खोटे बोललो नाही. एखाद्या वेळेस एक दोन पावले पुढे झाले असेल.एखादी चूक झाली असेल,पण मला समाज तरफडताना दिसत होता.लेकी बाळी पोरं बाळे मोठे करायचे असेल,तर शेतीबरोबर आरक्षणाचा आधार देणे गरजेचं आहे.त्यासाठी रात्रंदिवस तुटून पडलो. नोकरी आणि शिक्षणापासून कुणीही लांब राहू नये,हा समाजाचा हट्ट होता.सहा कोटी मराठ्यांचे लेकरे सुखी समाधानी राहण्यासाठी आयुष्य झिजवले,”असे जरांगे-पाटील यांनी सांगितले.

**तुमच्याशी गद्दारी करून मी मोठा झालो असतो**

“खूप जणांनी सातारा संस्थान ( पश्चिम महाराष्ट्र ) आणि हैदराबाद गॅझेट ( मराठवाडा ) येथील मराठा आरक्षणात गेला तर राज्याला नाहीतर देशाला वेढा टाकेल म्हणून आरक्षण मिळून देत नव्हते. दुसरे विरोधात गेले पण आपल्यांनी फितूर व्हायला नको होते. जीव धरणीला टेकला तरी मागे हटलो नाही,हे फितुरांनी समजून घ्यायला पाहिजे होते.लढणारा मी,समाज आहे. तुम्हाला विकून,तुमच्याशी गद्दारी करून मी मोठा झालो असतो,तर फितुरी करायला पाहिजे होती.तुमचे रक्त आमचे असून सुद्धा इतके भेसळ रक्तासारखे कसे वागलात? हे मराठ्यांना कळले नाही.आमच्यासोबत नाही तर मिळाले त्यात सुद्धा समाधान व्यक्त करत नाहीत. तुम्हाला आयुष्यात काही देता आले नाही. ४५ वर्षांच्या लढाईत काहीच करता आले नाही. पांढरे कपडे घालून मोठ्या गाड्यांमध्ये फिरले.फक्त टीव्हीसमोर बोलले आणि पुस्तके वाचली.यातच यांनी मोठेपण आणि मर्दांगी गाजवली,”असे म्हणत मराठा समाजातील नेत्यांची खरडपट्टी जरांगे-पाटील यांनी काढली.

# धनगर समाजाचा संताप उफाळला, एसटी आरक्षणासाठी धर्माबाद येथे मोर्चा व रास्ता रोको आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी :गिरमाजी सुर्यकार**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी राज्यभर धनगर समाज वेळोवेळी आंदोलन करत आहे. त्याकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. धनगर समाजाच्या जमातीला लागू असलेले आरक्षण संदर्भात अंमलबजावणी करावी. तसेच घटनेत असलेले एसटी प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यात यावे यासाठी जालना येथे 14 दिवसापासून उपोषण करीत असलेले दीपक बोऱ्हाडे यांना पाठींबा देण्यासाठी व त्यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी यासाठी धर्माबाद तालुका धनगर समाजाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक येथून ते रेल्वे गेट नंबर दोन पर्यंत च्या मुख्य रस्त्याने मोर्चा काढून त्या ठिकाणी रास्ता रोको रत ठिय्या मांडला.



रेल्वे गेट नंबर दोन या ठिकाणी जवळपास अर्धा तास रस्ता रोको करून प्रशासनाला जागे करून दिले आणि आमची आरक्षणाची अंमलबजावणी न झाल्यास यापेक्षाही मोठे मोर्चे काढू असा इशाराही देण्यात आला.

धनगर समाजाला तात्काळ एस.टी. प्रवर्गातील आरक्षण देण्यात यावे अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. २ दिवसांत दिपक बोऱ्हाडे यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास पुढील आंदोलनाची दिशा दिपक बोऱ्हाडे सांगतील त्या पद्धतीने राहणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. यानंतर धर्माबाद तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार श्री गावंडे सर यांना निवेदन देऊन त्यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्यात आले. यावेळी समाज बांधवांच्या वतीने यळकोट येळकोट 'जय मल्हार , धनगर एस.टी आरक्षण अंबलबजावणी झालीच पाहिजे , धनगर एकजुटीचा' विजय असो, अशा घोषणा देत आहेत. धर्माबाद येथील शेकडो धनगर समाज बांधव या ठिकाणी उपस्थित आहे.

।वेळी याबाबत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री बडीकर सर यांनी काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा बंदोबस्त ठेवले होते.

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व 20 प्रभागांमध्ये एकूण 24 ठिकाणी 'वेस्ट टू आर्ट'शिल्पांची उभारणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक 17 सप्टेंबर 2025 ते 2 ऑक्टोबर 2025 या कालावधीत आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छता ही सेवा 2025' अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व 20 प्रभागांमध्ये एकूण 24 ठिकाणी वेस्ट टू आर्टच्या माध्यमातून विविध शिल्पे, वेगवेगळ्या कलाकृतींची उभारणी करण्यात आली आहे.



या उपक्रमांतर्गत स्वच्छता निरीक्षकांनी कचऱ्यातील रिकाम्या पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक पाईप, खराब झालेली टायर्स अशा विविध वस्तूंपासून आकर्षक व उत्कृष्ट शिल्पांची निर्मिती केली. यामधून नागरिकांमध्ये आर आर आर अर्थात रिड्युस,रियुझ, रिसायकल या संदेशाचा प्रभावी प्रसार करण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या वतीने उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या घरगुती कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी *RRR सेंटरचा वापर* करावा तसेच कचऱ्यातून उपयुक्त व सुंदर वस्तू तयार करण्याची वेस्ट टू आर्ट ही सकारात्मक सवय अंगीकारावी.

या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबरोबरच पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. तसेच टाकाऊ पासून टिकाऊचा संदेश देत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचा महत्त्वपूर्ण संदेशही अधोरेखित झाला आहे

# ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त धारावीत ज्येष्ठांसाठी माहिती संवाद संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:(दत्ता खंदारे)**

ज्येष्ठांचे आरोग्य व मानसिकता तसेच त्यांच्या समस्या या विषयावर धारावीतील जय भवानी क्रीडा मंडळ तर्फे नवरात्र उत्सव सभा मंडळ नवी चाळ संत कक्कया मार्ग धारावी येथे ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ज्येष्ठांची संपर्क संवाद माहिती सत्राचे आयोजन १ ऑक्टो. रोजी सायंकाळी चार ते सहा या वेळात करण्यात आले होते. यावेळी सायकॉलॉजिस्ट स्पेशल श्रीमती निशिगंधा मगर यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना माहिती देऊन मार्गदर्शन केले.यावेळी ज्येष्ठांनी आहार विहारासह सकारात्मक विचारसरणीतून पुढील आयुष्य कसे जगावे याविषयी माहिती देण्यात आली. उपस्थित ज्येष्ठांच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न केला. सदर कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सेंटर कार्यक्रम प्रमुख श्रीमती दीपिका शेरखाने हटकर यांच्या सहयोगाने पार पडला.



यावेळी फेस कॉम संलग्न हॅपिनेस ज्येष्ठ नागरिक संघ धारावी यांचे प्रमुख श्री दिलीप गाडेकर तसेच गिरीराज शेरखाने, श्रीमती सुमन शेरखाने, श्री श्री गौतम वटकर,श्री मंजुनाथ शेरखाने, लोके श्री शेरखाने या कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सहकार्य केले त्या कार्यक्रमासाठी विभागातील ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्तेही उपस्थित होते.

# शेतकऱ्याच्या पोरांनो बापा पेक्षा नेता आणि शेतीपेक्षा पक्ष मोठा झाला का?

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :- जितेंद्र खोडे**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे अर्थकारण हे शेतीवरच अवलंबून आहे ती शेती मग कोरडवाहू असो की बागायती कोरडवाहू शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे त्यामुळे या शेतीला दरवर्षी हवामान बदलाचा किंवा कमी जास्त पाण्याचा फटका बसत असतो कधी कोरडा दुष्काळ तर कधी ढगफुटी सदृश्य पाऊस त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नात प्रचंड घट येत असते शेतीच्या भरोशावर या शेतकऱ्यांचे वर्षभराचे अर्थकारण चालत असते यामध्ये मुलांचे शिक्षण आई-वडिलांचा दवाखाना मुला मुलींचे लग्न सुखदुःखाच्या वेळी लागणारा पैसा हा या शेतीतूनच निर्माण होतो. त्यामानाने बागायती शेतीत पावसाळ्यातील पिके गेले तरी उन्हाळ्यातील पिकांच्या भरोशावर या शेतकऱ्यांचे अर्थकारण सुरू राहते.शेतीत पिकलं तर मार्केटमध्ये भाव मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांचा पाहिजे असा फायदा होत नाही. सरकार दरवर्षी एम एस पी चे भाव जाहीर करते,खरेदी मात्र होत नाही किंवा करत नाही. शेतकऱ्यांच्या घरातून कापूस सोयाबीन उडीद मुंग तूर ज्वारी निघून गेल्यानंतर शासन हमीभाव केंद्र सुरू करते आणि याचा फायदा जास्तीत जास्त व्यापारी लोक घेत असतात. एक रुपयात शेतकऱ्यांसाठी पिक विमा योजना महाराष्ट्रात सुरू असताना ती सुद्धा आता बंद झाली.आता हजारो रुपये खर्च करून शेतकऱ्यांना पिक विमा काढावा लागतो परंतु पिक विमा भेटण्याची कुठलीही शाश्वती शेतकऱ्यांना नाही पूर्ण महाराष्ट्रभर प्रचंड अतिवृष्टी झाली त्यामुळे महाराष्ट्रात सगळीकडे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची गुरे ढोरे शेत जमीन



पुराच्या पाण्यात वाहून गेली गावागावात घराघरात पुराचे पाणी शिरले प्रचंड प्रमाणात नुकसान झाले शेतकरी हा कुठलाही असो तो कोकणातील असो विदर्भातील मराठवाड्यातील पश्चिम महाराष्ट्रातील तो शेतकरीच आहे.हे सर्व होत असताना आमच्या गाव खेड्यातील ग्रामीण भागातील शेतकरी तरुण वर्ग मात्र हा सर्व तमाशा मुकाटपणे पाहताना दिसतो.बांगलादेश नेपाळ प्रमाणे यावर्षी अनेक देशात गेंझ आंदोलने पहावयास मिळाली नेपाळ सारखे इंडोनेशियात ही आंदोलन सुरू आहे आता पेरू देशातही तरुण वर्ग रस्त्यावर उतरला आहे त्या त्या देशातील समस्या वेगळी असेल प्रश्न वेगळे असतील परंतु आपल्या अन्नदात्या बापावर अन्याय होत असतानाही तरुणांनी शांत राहणे कितपत योग्य आहे हा खरा प्रश्न आहे सरकार कुठल्याही पक्षाचे असो जर शेतकऱ्यावर अन्याय होत असेल किंवा सरकारी धोरणांच्या विरोधात लढायचं असेल तर सर्वप्रथम आपण शेतकऱ्यांची मुलं आहोत शेतकरी आहोत हे सर्वांनी डोक्यात ठेवले पाहिजे राजकारणातील कुठलाही भाऊ दादा अण्णा साहेब आपल्याला अन्न खायला आणून देणार नाही आपला शिक्षणाचा खर्च करणार नाही किंवा आपल्या मोबाईल मध्ये रिचार्ज सुद्धा मारणार नाही. बापावर सरकार अन्याय करत असताना शेतकऱ्यांची मुले मात्र याविषयी ब्र शब्द सुद्धा बोलताना दिसत नाही.आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे हा मोबाईल सुद्धा शेतकरी बापाने शेतात पिकवलेल्या पैशातूनच घेऊन दिलेला आहे याच मोबाईल मध्ये अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी सोशल मीडिया आहे ज्याला जसं जमेल त्याने सरकारच्या विरोधात किंवा सरकारपर्यंत आवाज पोहोचेल या पद्धतीने सोशल मीडियावर व्यक्त होणे आवश्यक असून या माध्यमातून का होईना शेतकऱ्यांची बाजू लावून धरण्याचे काम शेतकरी पुत्रांनी केले पाहिजे परंतु नेत्याला बापा पेक्षा मोठे मानणारे शेतकरी पुत्राची संख्या महाराष्ट्रात जास्त झाल्यामुळे शेतकऱ्यांची बाजू शेतकऱ्यांची मुलं कुठेही मांडताना दिसत नाही यामुळेच की काय सरकारला शेतकऱ्यांच्या मुलांचा शेतकऱ्यांचा कुठलाही धाक उरला नाही,शहरात राहणाऱ्या नागरिकांना नोकरी करणाऱ्या लोकांना मुंबई पुणे नाशिक नागपूर सारख्या महानगरातील बलाढ्य लोकसंख्येला शेतकऱ्यांच्या सुखदुःखाविषयी काही देणे घेणे नाही आज प्रत्येक शेतकरी पुत्राकडे दीड जीबी डाटा असून या डाटा चा उपयोग नुसते रील पाहण्यासाठी होताना दिसतो आजूबाजूला शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात सुरू आहेत यावर आम्ही चुपचाप आहोत वर्षभर उन्हातानात राब राब राबणाऱ्या रक्ताचे पाणी करणाऱ्या आमच्या बापाविषयी आता जर आम्ही काही बोललो नाही लिहिले नाही किंवा शेतकरी आंदोलनात सहभागी झालो नाही तर भविष्यात ही वेळ आमच्या बापावर आल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र नक्की.

***विरेंद्र भाऊराव चव्हाण***
***अध्यक्ष***
**पत्रकार संरक्षण समिती**
**कळंब तालुका जि. यवतमाळ**

**कधी ओला दुष्काळ तरी कधी कोरडा दुष्काळ,**
**आसा आमच्या शेतकऱ्यावर येतो-जातो काळ.**

**तांडव केला निसर्गाने आज त्याच्या रानी,**
**शेतात ही आणि डोळ्यात ही मावत नाही पाणी.**

**व्यथा,कथा,भावना,संवेदना सगळे शब्द कमी पडले,**
**आमदार,खासदार,सरकार आज इथे सगळेच हारले.**

**निसर्गाने थोड ही दिल नाही त्याला आरक्षण,**
**दया-माया दाखवून थोडं ही केलं नाही पिकांचं रक्षण.**

**तरी तो पुन्हा सगळी घडी बसवणार आहे,**
**त्याच ठिकाणी,त्याच जोमाने, तेच पिक पेरणार आहे.**

**पुन्हा काढणी,मळणी,कापणी करून उरेल बाकी शून्य,**
**तरी ही जगाचा पोशिंदा जगाला पुरवेल अन्न-धान्य.**

**कु - शुभांगी सोमेश्वर खेत्रे**
**जिल्हा : बीड, ता: माजलगाव**

# शिरूर कासार मध्ये बिबट्याचा बछडा मृतावस्थेत आढळला ; न्यूमोनियामुळे मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार (प्रतिनिधी)**

शिरूर कासार शहरात जिजामाता चौका पासून हाकेच्या अंतरावर पैठण _पंढरपूर पालखी मार्गाच्या रस्त्याच्या कडेला मानव वस्तीत शुक्रवार 2 ऑक्टोबर रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास बिबट्याचा बछडा मृत अवस्थेत आढळून आला.

ही बाब गेल्या 30 वर्षापासून नित्य नियमाने सकाळी पाच वाजता पैठण _पंढरपूर पालखी मार्गे फिरायला जाणारे प्रसिद्ध लेखक डॉ.विठ्ठल जाधव यांच्या लक्षात आली. डॉ. जाधव यांना सकाळच्या अंधुक प्रकाशामध्ये जाताना हे बिबट्याचे पिल्लू दिसून आले नाही, मात्र दुर्गंधी येत होती. हा वास नेमका कशाचा आहे हे त्यांनी घरी परतताना पाहिले तर त्यांना रस्त्याच्या कडेला मृत बिबट्याचे पिल्लू दिसून आले .त्या क्षणी त्यांनी ताबडतोब सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राचे संचालक मानद वन्यजीव रक्षक सिद्धार्थ सोनवणे यांना भ्रमणध्वनीवरून




“ सदरील बिबट्याच्या बछड्याची मृत्यूची घटना ही मानव वस्तीच्या जवळ झालेली तालुक्यातील पहिलीच घटना . या अगोदर अशी घटना तालुक्यात कुठेही घडली नाही. मात्र या घटनेमुळे शिरूर कासार गाव परिसरातील नागरिकांनी सतर्क रहावे .जेणेकरून या बिबट्याच्या वयाचे आणखीन दोन ते तीन पिल्लं असण्याची शक्यता आहे .त्यामुळे रात्री किंवा सकाळी फिरताना सावधगिरी बाळगावी.”

**सिद्धार्थ सोनवणे**
**(मानद वन्यजीव रक्षक,बीड)**

संपर्क साधला व माहिती दिली. त्यानंतर तात्काळ सिद्धार्थ सोनवणे व वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन त्या बिबट्याच्या मृत बछड्यास ताब्यात घेऊन पशुधन विकास अधिकारी यांच्याकडे शवविच्छेदनासाठी पाठवले.

त्याचे शवविच्छेदन डॉ.देवानंद खाडे व डॉ.सतीश नरोटे यांनी केले.सदर बछड्याचा मृत्यू न्यूमोनियामुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे.

मृत बिबट्या बछडा हा मादी जातीचा असून पाच ते सहा महिन्यांचा आहे.

विभागीय वन अधिकारी अमोल गरकळ , मानद वन्यजीव रक्षक सिद्धार्थ सोनवणे,वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत काळे ,वनपाल अजय देवगडे यांच्या मार्गदर्शनाखाली

वनरक्षक जोशी यांनी घटनास्थळी पंचनामा केला.व पशुधन विकास अधिकारी डॉ. देवानंद खाडे व डॉ.सतीश नरोटे यांनी मृत बिबट्याच्या बछड्याचे शवविच्छेदन केले. शवविच्छेदनानंतर सदर मृत बिबट्याचे दहन वन विभागामार्फत करण्यात आले.

# भारताचे लोकप्रिय पंतप्रधान
## मा.श्री नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या वाढदिवसाच्या संदर्भात कार्यक्रम पंधरवडा साजरा

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

भाजपा अपंग मोर्चा वाशिम जिल्हाध्यक्ष विश्वास भाऊ ब्रह्मेकर
भाजपा अनसिंग मंडळ अध्यक्ष संतोष भाऊ उगले यांच्या प्रयत्नाने आज अनसिंग मंडळात अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकल वाटप करण्यात आली आहे



शिवाजी नवगणकर त्यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार आणि तीन चाकी सायकल देण्यात आली तसेच
भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष डॉ.जगदीश दाहत्रे साहेब व मा.बेटी बचाव बेटी पढाव जिल्हा अध्यक्ष रविभाऊ पळसकर मा.यु. मो. जिल्हा उपाध्यक्ष रामभाऊ अंकुशकर मा.यु. मो. तालुकाअध्यक्ष
देवानंद भाऊ शिंदे बालकिसन नवगणकर भाजपा ज्येष्ठ अनिल भाऊ देशपांडेअनसिंग मंडळ सरचिटणीस साईनाथ वाघमारे भाजपा अनसिंग शहराध्यक्ष
बालू भाऊ माल अनसिंग मंडळ कोषअध्यक्ष गजानन टेकाळे अनसिंग मंडळ अल्पसंख्याक अध्यक्ष अब्दुल गणी बागवान अनसिंग मंडळ उपाध्यक्ष गजानन नवगणकर अनसिंग मंडळ सोशल मीडिया अध्यक्ष गणेश राठोड अनसिंग बुथ अध्यक्ष राजेश वानखेडेतसेच अनसिंग मंडळ अध्यक्ष संतोष भाऊ उगले व विश्वास भाऊ ब्रम्हेकर आणि सर्व पदाधिकारी कार्यकर्ते
डॉ.जगदीश दहात्रे सर यांच्या निवासस्थानावर भेट देऊन मंडळ आणि जिल्ह्याचे शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे या प्रश्नावर चर्चा करण्यात आली.

# दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर लोकनेते दि.बा. पाटील शैक्षणिक संकुलन उभारणीस सुरुवात ...

## अन्य परवानगी नंतर भव्यदिव्य भूमिपूजन सोहळा साजरा करू ..विजय शिरढोणकर

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या हक्काच्या शैक्षणिक संस्थेच्या कामाला गती मिळाल्याने उरणकरांमध्ये मोठा आनंद उत्साह पहायला मिळाला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या लोकनेते दि.बा. पाटील शैक्षणिक संकुलनाच्या उभारणीसाठी विकासक म्हणून शिरढोणकर बंधू यांना संस्थेने शिक्कामोर्तब केल्याने उरणकरांसाठी आधुनिक दर्जेची शैक्षणिक इमारत लवकरच विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे.




एका गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीसाठी संघटीत झालेली भूमी पुत्रांची प्रकल्पग्रस्तांची हि संस्था आत्ता शेकडो हजारो विद्यार्थ्यांना महाविद्यालय संकुलन उपलब्ध करणार असल्याने एक आदर्श उदाहरण म्हणून या संस्थे कडे पाहिले जाणार आहे .वर्ष २००७ साली अनेक संघर्षातून दिनेश घरत व संतोष पवार यांच्या पुढाकाराने व अन्य प्रकल्पग्रस्तांच्या प्रयत्नाने उरण तालुका प्रकल्पग्रस्त शैक्षणिक व सामाजिक संस्था स्थापन करण्यात आली होती.या संस्थेच्या कार्याध्यक्ष पदी माजी आमदार दानशूर मनोहर शेठ भोईर असल्याने उत्तम आर्किटेक्चर ने सोयी सुविधा देणारी भव्य दिव्य संकुलन इमारत उभारावी यासाठी गेली अनेक वर्षे संस्था विश्वस्त कमिटी प्रयत्नशील होती . सामाजिक चळवळीतील नेतृत्वांना ,सर्व पक्षीय नेत्यांना सोबत घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या सहभागातून लोकनेते दि. बा .यांच्या नावाने हे संकुल उभारण्यासाठी आपल्याच समाजातील सक्षम भूमिपुत्र विकासक म्हणून असावा हि भावना संस्थेच्या मनात सातत्याने होती. अश्या वेळी नवी मुंबईतील नामांकित बांधकाम व्यावसायिक तसेच स्वतः शिक्षक पुत्र , शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवी विजय नामदेव शिरढोणकर व त्यांचे बंधू राजेंद्र शिरढोणकर बंधू यांचा प्रस्ताव संस्थेच्या विश्वस्त कमिटीने मोठया आनंदोत्सवात एकमताने मंजूर केल्याने संस्थेने समाधान व्यक्त केला. या करारा नंतर दसरा सणाच्या शुभ मुहूर्तावर ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी संकुलनाच्या सुरक्षा भिंत उभारणीच्या प्रारंभी हिंदू संस्कृतीतील विधिवत पद्धतीने पूजा ,अर्चना ,नारळ फोडून स्व.दि बा पाटील शैक्षणिक संकुलन अश्या नामफलकाचे अनावरण उद्घाटन करण्यात आले.

या शुभ प्रसंगी माजी आमदार मनोहर भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष दिनेश घरत, कार्याध्यक्ष भूषण पाटील, उपाध्यक्ष काशिनाथ गायकवाड, संघटक संतोष पवार, समन्वयक सुधाकर पाटील व अन्य वर्किंग कमिटी व विश्वस्त सदस्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आधुनिक ,प्रशस्त अश्या वास्तूच्या कार्याला अभिमान वाटेल असे भव्य दिव्य शैक्षणिक इमारतीचे भूमिपूजन लवकरच करू , हे स्वप्न माझे वडील मुख्यधापक आदर्श शिक्षक स्व. नामदेव पांडुरंग शिरढोणकर यांचे होते आम्ही दोन्ही त्यांचे पुत्र म्हणून ते स्वप्न लवकरच पूर्ण करू या पुण्य कार्यासाठी माझ्या संपूर्ण शिरढोणकर परिवाराने एक दिलाने मंजुरी दिली आहे म्हणून आपण हि आमच्या या कार्यासाठी सहकार्य करावे . भविष्यात प्रकल्पग्रस्तांच्या मुलांसाठी परगावी जाण्याची गरज लागणार नाही यासाठी सर्वस्वी प्रयत्न करू असा विश्वास या प्रसंगी उद्योजक विजय शिरढोणकर व राजेंद्र शिरढोणकर यांनी व्यक्त करीत संस्थेचे आभार मानले. यावेळी लोकनेते दि.बा.पाटील यांना अभिवादन करून अमर रहे.. अमर रहे.. दिबा पाटील अमर रहे असा जय घोष करण्यात आला.

संस्थेला आजपर्यंत ज्या ज्या दानशूरांनी मदत केली त्या सर्वांचे हे कार्य कधीही थांबू द्यायचे नाही, या पवित्र कार्यास आपण सर्वांचा सदैव सहकार्य व आशीर्वाद असावा असे ही या निमित्ताने सांगत उपस्थित संस्था सदस्यांनी एकमेकांना दसऱ्याच्या शुभेच्छा देत हा अविस्मरणीय असा आनंद उत्सव साजरा केला. यावेळी ०६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या आंदोलनात सर्व भूमिपुत्रांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे व नवी मुंबई विमानतळाला दि बा पाटील यांचेच नाव द्यावे यासाठी सरकारला जागे करण्यासाठी उपस्थित रहावे असे आव्हान हि करण्यात आले.

# दिव्यांगांनी शिकवला माणुसकीचा अर्थ – उरण तालुक्यातून महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी आदर्श मदतीचा हात!"

**दैनिक युवक आधार**
**रणिता ठाकूर उरण रायगड**

उरण, रायगड–दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी संपूर्ण महाराष्ट्राला माणुसकीचा खरा अर्थ शिकवला. पूरग्रस्तांसाठी अनेक सक्षम लोक पुढे येतात, परंतु स्वतःच्या मर्यादा बाजूला ठेवून जेव्हा एखादा दिव्यांग व्यक्ती इतरांच्या दुःखासाठी पुढाकार घेतो, तेव्हा ती मदत नसून ती एक प्रेरणादायी आदर्शकथा बनते. आई फाउंडेशन तर्फे रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांना आवाहन करण्यात आले होते की – "आपल्या परीने शक्य तितके सहकार्य पूरग्रस्तांसाठी करूया."
या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत तालुक्यातील दिव्यांगांनी आर्थिक व वस्तुरूपाने मदत जमा केली.या मदतीतून पूरग्रस्त मुलांसाठी शैक्षणिक साहित्य तसेच महिलांसाठी साड्यांचा समावेश करण्यात आला.ही संपूर्ण मदत आई फाउंडेशनतर्फे एकत्र करून
NCP( शरद पवार गट) महाराष्ट्र राज्य महीला सचिव व आधार सावली फाऊंडेशन च्या सल्लागार सौ. भावना ताई घाणेकर यांच्या वाढदिवसाच्या दिवशी त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. भावनाताईंनी दिव्यांग बांधवांच्या या सहकार्याचे मनापासून कौतुक करत सांगितले –
"जे स्वतः सक्षम नाहीत त्यांनी पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे करणे ही खरी माणुसकी आहे. हा उपक्रम महाराष्ट्रासाठी आदर्श ठरेल."
या कार्यक्रमात आई फाउंडेशनचे मदन पाटील व रणिता ठाकूर (पत्रकार व सामाजिक कार्यकर्ती) यांनी मनोगत व्यक्त करत सांगितले की–"या मदतीत अशाही काही दिव्यांगांनी सहभाग घेतला ज्यांची आर्थिक आणि शारीरिक परिस्थिती अतिशय कठीण आहे. तरीही त्यांनी माणुसकीची जाण जपत योगदान दिले, हे समाजासाठी प्रेरणादायी आहे."
सदर उपक्रम सफल करण्याकरता







मदन पाटील, उमेश पाटील,महेश पाटील, रणिता ठाकुर, संदेश राजगुरू, नितीन सांगवीकर,मिल्टन मिरंडा, निशा माने व राजश्री घरत आदी सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले
उरण तालुक्यातील दिव्यांगांनी दाखवलेली संवेदनशीलता आणि मदतीची प्रेरणा संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक नवदिशा ठरणार आहे.

# पिंपळगाव बसवंत खासदार भगरे सर यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ नागरीकदिन साजरा

**दैनिकः युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**

मा. ग्रामपंचायत सरपंच भास्करनाना बनकर प्रतिष्ठान च्या वतीने ५०१ ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार
ज्येष्ठांचे आशीर्वाद म्हणजे घराघरातले देवस्थान,
त्यांच्याविना समाज अपूर्ण – त्यांचाच खरा मान–सन्मान
ज्येष्ठ नागरिक दिन २०२५
महाराष्ट्र शासनाच्या वतीने साजरा करण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त
भास्करनाना बनकर प्रतिष्ठान, पिंपळगाव बसवंत यांच्या वतीने
आपल्या शहरातील ५०१ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला आहे. आज दिनांक : १ ऑक्टोबर २०२५
वेळ : सकाळी १० वा.
स्थळ : पिंपळगाव बसवंत सोसायटीचे सभागृह येथे कार्यक्रमास सुरुवात झाली
सुरुवातीला उपस्थित मान्यवरांनी महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन केले.
यावेळी उपस्थित काही मान्यवरांचे भाषणे देखील झाली.
या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी : दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार मा. भास्करराव भगरे सर




कार्यक्रम अध्यक्ष : नाशिक जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष
श्री. अशोकराव होळकर
प्रमुख पाहुणे :
पिंपळगाव बसवंत शहराचे कर्तव्यदक्ष विकास पुरुष म्हणून ओळखले जाणारे ,लोकप्रिय, आदरणीय,श्री. भास्करराव नाना बनकर – माजी सरपंच, पिंपळगाव बसवंत
श्री. आर. डी. जाधव सर – अध्यक्ष, तालुका ज्येष्ठ नागरिक संघ
श्री. एस. के. पाटील सर – अध्यक्ष, पिंपळगाव बसवंत ज्येष्ठ नागरिक संघ
श्री. चंद्रकांत बनकर – चेअरमन, पिंपळगाव बसवंत विविध कार्यकारी सहकारी सोसायटी
श्री. साहेबराव डेरे – चेअरमन, जॉईंट फार्मिंग
ज्येष्ठ नागरिक आमचा अमूल्य ठेवा आहेत, त्यांच्याविना समाजाचे अस्तित्व अपूर्ण आहे. या ५०१ उपस्थित जेष्ठ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला व हा सोहळा अधिक भव्य करण्यासाठी आपण सर्वांनी उपस्थित दाखवल्याबद्दल श्री भास्कर नाना बनकर प्रतिष्ठान च्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले .
– **भास्करनाना बनकर प्रतिष्ठान, पिंपळगाव बसवंत**
ज्येष्ठनागरिकदिन आदरअभिवादन भास्करनाना_बनकर_प्रतिष्ठान पिंपळगावबसवंत आदराचेक्षण सन्मानसोहळा संस्कार_आणि_परंपरा नुसार संपन्न

# श्रीवर्धनमध्ये खासदार सुनील तटकरे व मंत्री आदिती तटकरे यांचा दौरा : विकासकामांचे लोकार्पण, बांधाऱ्याचे आश्वासन – विरोधकांना अप्रत्यक्ष टोला

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

नवरात्री उत्सवाचे औचित्य साधत श्रीवर्धनचे लोकप्रीय खासदार मा. श्री. सुनील तटकरे साहेब आणि राज्याच्या महिला व बालविकास मंत्री मा. ना. कु. आदितीताई तटकरे यांनी श्रीवर्धन दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी ग्रामदैवत श्री सोमजाई आई तसेच दुर्गामातेचे दर्शन घेऊन भाविकांना शुभेच्छा दिल्या.
यानंतर खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते श्रीवर्धन शहरात सोलर स्ट्रीट लाईट प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. या प्रकल्पामुळे नगरपालिकेवरील अतिरिक्त विजेचा भार कमी होणार असून शहराला आधुनिक व पर्यावरणपूरक स्वरूप प्राप्त होणार आहे.
भाषणात खासदार सुनील तटकरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "फक्त आश्वासने देऊन निघून जाणाऱ्यांचा काळ संपला आहे, आता खऱ्या अर्थाने विकासाची कामे होत आहेत." त्यांनी यावेळी श्रीवर्धन दांडा विभागातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या बांधाऱ्याचे काम काही महिन्यांतच सुरू होणार असल्याचे ठाम आश्वासन दिले.
त्याचबरोबर, "समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्य टिकवण्यासाठी फक्त सरकार नव्हे तर नागरिकांचीही जबाबदारी आहे. स्वच्छतेसाठी सर्वांनी पुढे यायला हवे," असे आवाहनही त्यांनी केले.










या दौऱ्यामुळे श्रीवर्धनकरांमध्ये विकासाच्या नव्या आशा निर्माण झाल्या असून नागरिकांनी तटकरे साहेबांच्या कामकाजाचे जोरदार स्वागत केले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमातून पुन्हा एकदा दाखवून दिले की विकासाच्या आघाडीवर ते नेहमीच सक्रिय असून, टीका करणाऱ्यांना उत्तर प्रत्यक्ष कामांतूनच दिले जाणार आहे.

# नवदुर्गा मित्र मंडळ व जय भवानी दुर्गा मित्र मंडळ भातोडी येथे आरतीच्या मानकरी- सौ पुष्पाताई मस्के

**दैनिक युवक आधार**
**टेंभुर्णी प्रतिनिधी अनिल ससाने**

भातोडी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथे
आज जय भवानी दुर्गादेवी मित्र मंडळ तथा नवदुर्गा मित्र मंडळाच्या देवीच्या आरतीच्या मानकरी सन्मानीय जि. सदस्य तथा नियोजन समीती सदस्य तथा रुग्णकल्याण समीती सदस्य मा. शालिकराम पाटील म्हस्के साहेब यांच्या सुविद्य पत्नी समाजसेविका सौ पुष्पाताई म्हस्के ताई यांच्या हस्ते आरती करण्यात आली प्रसंगी सोबत कविताताई खोत, गावच्या सरपंच सौ भारती मधुकर गोफणे, समाजसेविका ज्योति ताई भोरे, सुनीताई ऊगले, दुर्गाताई भोरे, प्रयागबाई भोरे,किरणताई, शांताबाई ऊगले, कावेरी चव्हाण, शीतलताई गावंडे सर्व माता भगिनी युवा व पुरुष मंडळ उपस्थित होते.....











# पत्रकार चंद्रशेखर जाधव यांची रिपब्लिकन सेनेच्या जिल्हा सचिव पदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**मुंबईः- (प्रमोद तरळ)**

आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार चंद्रशेखर सुरेश जाधव येळवणकर यांची रिपब्लिकन सेनेचे सर सेनानी, रिपब्लिकन नेते डॉ.आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार मुंबई उत्तर पश्चिम जिल्हा सचिव व दिंडोशी विधानसभा प्रभारी म्हणून नियुक्ती झाल्यामुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांना नियुक्तीपत्र देताना महाराष्ट्राचे सचिव विनोदभाई काळे, मुंबई अध्यक्ष प्रकाशभाऊ खंडागळे, पक्षाचे प्रवक्ते सतीशकुमार साळुंके, मुंबई महासचिव गजानन तांबे, मुंबई उपाध्यक्ष अमोल रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.
पत्रकार चंद्रशेखर जाधव यांनी मुंबईतल्या विविध सामाजिक संस्था, संघटनामधून काम केले आहे. त्यांचा सामाजिक क्षेत्रातील अनुभव दांडगा आहे. त्यांच्या कामाची दाखल घेऊन त्यांना उत्तर पश्चिम जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आली आहे. जाधव यांना यापूर्वी शहीद भाई संगारे स्मृती 'चळवळ रत्न',कुरार भूषण, अष्टगंध या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर मधिल येळवण हे त्यांचे मूळ गाव आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# कारखाना अडचणीत असताना सर्व सभासदानी साथ द्यावी :- पृथ्वीराज बापू जाचक

## सपकळ राजपुरे दोन्ही उभयंताच्या हस्ते बॉयलर अग्नीप्रदीपण

**दैनिक युवक आधार**
**सणसर - विकास क्षत्रिय**

श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना अडचणीत असून सभासदांनी आपला ऊस कारखान्यासच घालून सहकार्य करून साथ द्यावी असे मत श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक यांनी मांडले कारखान्याचा 70 व बॉयलर अग्निप्रदीपण समारंभ संचालिका सौ माधुरी सागर राजपुरे व त्यांचे पती सागर राजपुरे यांच्या हस्ते पार पडला व युनिट नंबर दोनचे सौ सुचिता सचिन सपकळ व त्यांचे पती सचिन अशोकराव सपकळ यांच्या हस्ते पार पडला.



पुढे बोलताना जाचक म्हणाले की श्री छत्रपती कारखाना आर्थिक अडचणीत आहे. मात्र तरीही कारखान्याला ऊस पुरवठा करणारे,तोडणी यंत्रणा तयार आहे. कारखाना इतर कारखान्याच्या तुलनेत मागे राहणार नाही.छत्रपती कारखान्याला गतवैभव प्राप्त करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे आपल्याच कारखान्यास ऊस घालावा येणाऱ्या काळात खोडवा उसास अनुदान देण्याचा विचार संचालक मंडळ करत आहे.राज्यात सर्वात अगोदर कांडे बिल देण्यास श्री छत्रपती कारखान्याने सुरुवात केली स्पर्धा वाढल्याने कारखान्यांना चांगले काम करावे लागेल साखर उतारा बारा टक्केच्या पुढे गेला पाहिजे असे मत पृथ्वीराज जाचक यांनी व्यक्त केले.

यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास गावडे माजी अध्यक्ष प्रशांत दादा काटे भाजपाचे नेते तानाजी थोरात संभाजी काटे विजय आबा पाटील अशोक काळे राजाराम महाराज रायते रवींद्र टकले विशाल निंबाळकर संतोष चव्हाण यांनी भाषणे केली यावेळी मोठया प्रमाणात सभासद कामगार उपस्थित होते.

# पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ कात्रज पुणे यास कडून माजगाव येथील कळमजाई महिला सहकारी दूध उत्पादक संस्था यांना आदर्श दूध संस्था पुरस्कार प्रधान...



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ.देवेंद्र ओव्हाळ खेड पुणे**

खेड तालुक्यातील पश्चिम भागातील सुरकुंडी-माजगाव हे अतिशय छोटेसे गाव असुन या गावांमध्ये पशुधन चांगल्या प्रकारे असून येथील लोक शेतीला पूरक असा पशुधन व दुग्ध व्यवसाय करत आहेत सुरकुंडी गोरेगाव येथील दूध संकलन माजगाव येथे केले जाते एकंदरीत दूध संकलनाची सर्व परिस्थिती पाहता चांगले व स्वच्छ दूध निर्मिती करून पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ कात्रज पुणे यांनी कळमजाई महिला सहकारी दूध उत्पादक संस्था माझगाव यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला याप्रसंगी मा. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत तसेच मा.श्री ॲडवोकेट स्वप्निल बाळासाहेब ढमढेरे चेअरमन मा. श्री अरुण शेठ सिताराम चांभारे संचालक सौ.लताताई नामदेव गोपाळे संचालक सौ. रोहिणी गणेश कडलग चेअरमन सौ . कल्पना मयूर लोखंडे सरपंच सौ. पल्लवी कडलग सौ.चतुरा लोखंडे ग्रा.सदस्य सौ.शोभा कडलग सौ. उर्मिला सुपे सौ.शोभा दिनकर कडलग इत्यादी महिला भगिनी व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# विहिरीवरील मोटार सुरु करताना शेतकऱ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

## देवगाव परिसरात हळहळ; अकस्मात मृत्यूची नोंद

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**



**विंचूर (नाशिक)** : दि. ३० सप्टेंबर देवगाव ता.निफाड येथील संतोष सोमनाथ बोचरे (वय ३४) या तरुण शेतकऱ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी सकाळी घडली.

सकाळी साडेसहा ते सातच्या सुमारास बोचरे हे शेतातील विहिरीवरील इलेक्ट्रिक मोटार सुरू करण्यासाठी गेले असता त्यांना तीव्र विद्युत धक्का बसला. धक्क्याने ते जागीच कोसळले. कुटुंबीयांनी तत्काळ त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. तेथून पुढील उपचारासाठी निफाड उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

या घटनेची माहिती पोलीस पाटील सुनील संपतराव बोचरे यांनी दिली असून, लासलगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक औदुंबर मुरडणर करीत आहेत.

संतोष बोचरे यांच्या अचानक मृत्यूमुळे देवगाव व परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी तसेच आई-वडील असा परिवार आहे.


# पालोद येथे जिओची रेंज गायब, मोबाईल धारकांची गैरसोय !

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड :- तालुक्यातील पालोद गावात जिओ मोबाईल कंपनीचा टॉवर असून नसल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने मोबाईल धारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. येथे काही वर्षांपूर्वी जिओ कंपनीने टॉवर कार्यान्वित केला आहे.

मात्र येथे टॉवर असून नसल्यासारखी परिस्थितीने नागरिक बेजार झाले आहेत. गेल्या काही दिवसापासून मोबाईलचे अचानक नेटवर्क जाणे, फोन सुरू असताना अचानक कट होणे, या समस्येने 'टॉवर आहे नावाला, मात्र रेंज नाही गावाला ', अशी म्हणण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे.

पालोद येथे खूप वर्षाच्या प्रतीक्षेनंतर जिओ कंपनीने टॉवर उभारला आहे. मात्र टॉवर लहान आणि जिओ कंपनीचे




ग्राहक अधिक वाढल्याने नेट धीम्या गतीने चालत आहे. ' ४ जी,५ जी ' च्या नावावर महागडे रिचार्ज ग्राहक करतात. मात्र नेट टुजी अवस्थेत चालत असल्याने ग्राहक पूर्ण वैतागले आहेत. यामुळे ग्राहकांचा पैसा वाया जाऊनही नेटचा फायदा मिळत नसल्याने ग्राहकांची मोबाईल कंपनीवर नाराजी दिसून येत आहे. पालोद

" गावात जिओ कंपनीचा टॉवर उभारून काही वर्ष लोटली गेली. मात्र येथे टॉवर असून नसल्यासारखी परिस्थिती आहे. कंपनीच्या वरिष्ठांनी दखल घेत मोबाईल धारकांच्या समस्या सोडवाव्यात "

**- सतिश सोनवणे**
**ग्राहक पालोद ( ता. सिल्लोड )**

गावाला कोणत्याच मोबाईल कंपनीची पुरेशी रेंज नसल्याने सिम कार्ड कोणत्या कंपनीचे वापरावे, असा प्रश्न सध्या नागरिकांना पडला आहे.

कधी कधी तर गावातील वीज गुल होताच जिओ कंपनीच्या टॉवरचे नेटवर्क गायब होते. त्यामुळे तेथील टॉवरला स्वतंत्र ट्रांसफार्मर अथवा जनरेटर ची व्यवस्था करावी अशी मागणी त्रस्त नेटकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी निमित्ताने सिल्लोड जिल्हा शाखेच्या वतीने लावले अजान वृक्षाचे शंभरावे रोप

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** - आज 2025 च्या दसऱ्याला राष्ट्र उभारणीत भरीव योगदान दिलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शताब्दी आहे.तसेच हे वर्ष विश्व् गुरु संत ज्ञानेश्वर महाराज यांचे सातशे पन्नासवे सुवर्ण जयंती वर्ष ही आहे.2024 च्या दसऱ्या पासुन संघाच्या सिल्लोड जिल्हा शाखेचे गतीविधी विभागा तर्फे अध्यात्मिक व पर्यावरनीय महत्व असलेल्या अजाणं वृक्ष म्हणजेच शांभवी या वृक्षाचे राज्यभर विविध मंदिर, धार्मिक संस्था, कीर्तन शाळा, देवस्थान ई. ठिकाणी रोपण करण्यास सुरुवात करण्यात आली व आज शंभराव्या झाडाचे रोपण शहरातील श्री स्वामी समर्थ मंदिराच्या आवारात संघाच्या स्वयंसेवकांच्या हस्ते करण्यात आली. देशात हा उपक्रम लक्ष वेधी ठरला आहे. आळंदी येथे माऊलिंच्या समाधी स्थळी सातशे 30वर्ष वयाचा अजान वृक्ष असून औषधी गुणाने युक्त असून पूर्वी धनुर्वात, घटसर्प, डांग्या खोकला या आजारावर वापरत असत, हा अमूल्य ठेवा भारत मातेच्या चरणी असावा म्हणून आज हें शंभरावे रोपण केले असे गतीविधी चे डॉ. संतोष पाटील यांनी सांगितले.




# खांदाट पाली ते निरबाडे रस्त्याची अक्षरशः चाळण!

## जीवघेणा प्रवास कधी संपणार? वाहन चालकांमधून होतोय उपस्थित सवाल?

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी):--**

तालुक्यातील खांदाट पाली ते निरबाडे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. 'रस्ता खड्ड्यात की खड्ड्यात रस्ता' अशी परिस्थिती पहावयास मिळत आहे. वाहन चालकांची खड्डे चुकवताना दमछाक होत आहे. तसेच या मार्गावरील पुलावर देखील हीच परिस्थिती असल्याने वाहन चालकांना आपला जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागत आहेत. पावसाळ्यानंतर तरी या रस्त्याचे डांबरीकरण व्हावे, अशी मागणी येथील ग्रामस्थांमधून होत आहे.

कळंबस्ते - धामणंद मार्गावरील खांदाट पाली ते निरबाडे मार्गे काडवली तसेच पंधरागावकडे जाण्यासाठी हा जवळचा मार्ग आहे. यामुळे बहुतांशी वाहनचालक या मार्गाचा सर्रास वापर करतात. मात्र, गेल्या काही



महिन्यांपासून खांदाट पाली ते निरबाडे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या मार्गावर मोठे मोठे खड्डे पडले आहेत पावसात तर या खड्ड्यांमधून पाणी साचत असल्याने वाहन चालकांना खड्डे चुकवणे अवघड होऊन बसत आहे. विशेष म्हणजे वाहने खड्ड्यात आपटून वाहन चालकाला त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता खड्ड्यात की खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. चढ अथवा उतारात देखील हीच परिस्थिती असून खडी देखील मोठ्या प्रमाणात वर आली असल्याने दुचाकी घसरून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

या मार्गावरील पुलावर देखील हीच परिस्थिती असून पावसाळ्यापूर्वी येथील ग्रामस्थांनी काही खड्डे सिमेंट कॉँक्रीटने बुजवले आहेत. मात्र, अन्य खड्डे 'जैसे थे' असल्याने या पुलावरून वाहने चालवताना जीव मुठीत घ्यावा लागत आहे. तसेच हा पूल जुना असल्याने नव्याने पूल बांधण्यात यावा, अशी मागणी येथील ग्रामस्थांमधून जोर धरू लागली आहे.

याचबरोबर चारगावची ग्रामदेवता श्री रामवरदायिनी मंदिरापासून ते काडवलीकडे जाणाऱ्या पुलावर देखील तशीच परिस्थिती आहे २१ जुलै २०२१ च्या महापुरात या पुलाचे रेलिंग तुटलेले असून अजूनही या पुलाची डागडुजी करण्यात आलेली नाही. हा पूल देखील काही वर्षांपूर्वी बांधण्यात आला असून नव्याने पूल बांधण्याची गरज निर्माण झाली आहे. या पुलावरील खड्डे चुकवताना रेलिंग नसल्याने वाहन नदीत कोसळण्याचा धोका नाकारता येत नाही. एकंदरीत हा मार्ग खड्डेमय तितकाच धोकादायक बनलेला असून शासन प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# कसबा नवरात्र मित्र मंडळात श्री सत्यनारायणाची महापूजा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी-अनिकेत मोहित**

नवरात्रीच्या पावन औचित्य साधून कसबा नवरात्र मित्र मंडळात श्री सत्यनारायणाची महापूजा मोठ्या भक्तिभावात पार पडली. या मंडळाचे हे ४१ वे वर्ष असून सुरुवातीपासूनच मंडळ समाजोपयोगी उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी प्रसिद्ध आहे.

यावर्षीच्या महापूजेला बसण्याचा मान मंडळाचे सदस्य श्री आशिष अजित कदम व सौ. कदम यांना लाभला. पूजा विधी संपन्न होताच मंडळाचे अध्यक्ष यांनी मंडळाच्या आगामी उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले. “मंडळाने आतापर्यंत समाजोपयोगी व सांस्कृतिक कार्यक्रमांची परंपरा जोपासली आहे. यापुढेही समाजहिताचे उपक्रम आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम अधिक उत्साहात राबवले जातील,” असे अध्यक्षांनी सांगितले.





# ओला दुष्काळ जाहीर करा : काँग्रेस पक्षाची निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

राळेगाव:-दि.२९/०९/२०२५ रोजी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले,तालुक्यात एक महिन्यापासून अतिवृष्टी होत असून या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पिकाचे नुकसान झाले असून शेतकरी अत्यंत हालाखीच्या स्थितीत जगत आहे अशातच शासनाने तातडीने मदत करून धीर देणे असतांना अजून पर्यंत शासन स्तरावर कुठल्याही प्रकारची हालचाल सुरु झाली नाही. शासनाने तातडीने मदत न दिल्यास तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाल्याशिवाय राहणार नाही तर आमच्या शेतकरी बांधवांची हाक सरकारपर्यंत पोहचवण्यासाठी मागण्यांचे निवेदन सादर केले, या निवेदनाचा शासनाने सहानुभूती




पूर्वक विचार न झाल्यास आम्हाला मोठे आंदोलन उभारावे लागेल असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला.

निवेदन सादर करतेवेळी अरविंद वाढोणकर,राजेंद्र तेलंगे,प्रदीप ठुणे,सुधीर जवादे,दिपक देशमुख,अंकुश मुनेश्वर,पुरुषोत्तम चिडे,रविंद्र शेराम,राहुल बहाळे, विक्की इंगळे,मंगेश पिंपरे,जितेंद्र कहूरके,राजेंद्र नागतुरे,विनोद जयपूरकर,राजू पुडके,श्रावणसिंग वडते,अफसर अली सैय्यद,रामधन राठोड,सुनील भामकर,मधूकर राजूरकर,मनोज पेंदोर,रामु भोयर, गजानन पाल,विनोद नरड,अंकुश रोहणकर,मिलिंद इंगोले,अनील देशमुख,प्रफुल्ल तायवाडे,नंदू जयसिंगकार,रविंद्र निवल,राजू महाजन,अंकित कटारिया,केशवराव पडोळे,मारोती पाल,शंकर जुनगरे, मारोती नेहारे,पंकज गावंडे,भरत ठुणे, मधूकर चाफले,मोहन नरडवार यांच्या सह अनेक शेतकरी बंधू,महिला भगिनी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेल तहसील कार्यालय अंतर्गत साजरा करण्यात महसूल पंधरवडा



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म दिन 17 सप्टेंबर ते 2 आक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंतीचे औचित्य साधून राज्य सरकारच्या महसूल विभागाने आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत सेवा पंधरवडाच्या अनूषंगाने राज्यभरातील ग्रामपंचायती,महानगरपालिका आदी ठिकाणी सेवा पंधरवडा कडील कार्यक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आलेली आहेत. त्याअनूंषगाने पहिला टप्पा हा गावातील पाणंद रस्ते मोकळी करणे,दुसरा टप्पा हा सर्वासाठी घरे या उपक्रमासाठी पुरक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे (भा.प्र.से.),पनवेल उपविभागीय अधिकारी पवन चांडक,अपर तहसिलदार पनवेल जितेंद्र इंगळे, नायब तहसिलदार राजश्री जोगी, संभाजी शेलार व संजय भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पंधरवडा च्या तिसऱ्या

# आर्थिक गुन्ह्यांमध्ये मुंबई आघाडीवर

## एनसीआरबी अहवालातील निरीक्षण; मेट्रो शहरांमध्ये सर्वाधिक गुन्ह्यांची नोंद आर्थिक राजधानीत

मुंबई : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईने २०२३ मध्ये एकूण ६,४७६ प्रकरणांसह मेट्रो शहरांमध्ये आर्थिक गुन्ह्यांच्या बाबतीत आघाडी घेतली आहे, अशी माहिती नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालातून समोर आली आहे. तथापि, २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये मुंबईत आर्थिक गुन्ह्यांच्या संख्येत घट झाली आहे.

महाराष्ट्रामध्ये आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांची संख्या गेल्या काही वर्षांत वाढताना दिसते आहे. २०२१ मध्ये १५,५५०, २०२२ मध्ये १८,७२९ आणि २०२३ मध्ये ही संख्या वाढून १९,८०३ वर पोहोचली, असे एनसीआरबी अहवालात नमूद करण्यात आले आहे.



राजस्थान २७,६७५ प्रकरणांसह देशात पहिल्या क्रमांकावर आहे, तर तेलंगणा दुसऱ्या क्रमांकावर असून तेथे २६,३२१ प्रकरणांची नोंद झाली आहे. महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर आहे.

महाराष्ट्रातील एकुण आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांपैकी ५४.९ टक्के प्रकरणांमध्ये पोलिसांनी आरोपपत्र दाखल केली आहेत, असेही या अहवालात सांगण्यात आले आहे.

सायबर क्राईमबाबत बोलायचे झाल्यास, महाराष्ट्रात २०२३ मध्ये ८,१०३ प्रकरणे नोंदवली गेली आणि तो चौथ्या क्रमांकावर राहिला. कर्नाटकने २१,८८९ सायबर गुन्ह्यांसह देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. मेट्रो शहरांतील सायबर क्राईमप्रकरणी, मुंबईत ४,१३१ प्रकरणांची नोंद झाली असून ती तिसऱ्या स्थानावर आहे.

बेंगळुरूने १७,६३१ प्रकरणांसह पहिला क्रमांक पटकावला असून, हैदराबाद ४,८५५ प्रकरणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### सर्वाधिक गुन्हे नोंदविलेले पहिली ३ शहरे

| मेट्रो शहर | गुन्ह्यांची संख्या |
|---|---|
| मुंबई | ६,४७६ |
| हैदराबादने | ५,७२८ |
| जयपूर | ५,३०४ |

### २०२२ च्या तुलनेत मुंबईत आर्थिक गुन्ह्यांमध्ये घट

| वर्ष | गुन्ह्यांची संख्या |
|---|---|
| २०२१ | ५,६७१ आणि |
| २०२२ | ६,९६० |
| २०२३ | ६,४७६ (४८४ प्रकरणांची घट) |

या प्रकरणांपैकी ३७.९ टक्के प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल.

# विधान परिषद निवडणुकांसाठी काँग्रेसकडून समन्वयकांची नियुक्ती

## पुणे पदवीधर मतदारसंघासाठी बाळासाहेब थोरात समन्वयक

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या २०२६ मध्ये होणाऱ्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकांसाठी महाराष्ट्र काँग्रेसने मंगळवारी वरिष्ठ नेत्यांची समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे.

पक्षाने मंगळवारी दिलेल्या निवेदनानुसार, पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि काँग्रेस कार्यकारिणी समितीचे सदस्य बाळासाहेब थोरात यांची पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

विधान परिषदेतील काँग्रेस गटनेते आणि माजी मंत्री सतेज पाटील यांची नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

माजी मंत्री व काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष सुनील देशमुख यांना छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघासाठी, तर माजी आमदार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष एम. एम. शेख यांना अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी समन्वयक म्हणून नेमण्यात आले आहे, असे काँग्रेसने पुढे स्पष्ट केले.

# धर्माबाद तालुक्यातील निराधार लाभार्थ्यांचे मानधन रखडल्याने उपजीविकेवर गदा

. दैनिक युवक आधार
धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार

धर्माबाद तालुक्यातील शेकडो निराधार लाभार्थ्यांचे मानधन तब्बल अकरा महिन्यांपासून रखडले असून यामुळे गरीब, विधवा, वृद्ध आणि दिव्यांग अशा सर्वच घटकांवर आर्थिक संकट ओढवले आहे. प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही निधी वितरण न झाल्याने लाभार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

निराधार योजना ही समाजातील उपेक्षित घटकांना दिलासा देण्यासाठी शासनाने सुरु



केली. परंतु, प्रत्यक्षात बऱ्याच महिन्यांपासून मानधनाचा एकही हप्ता न मिळाल्याने लाभार्थ्यांना उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अन्नधान्य, औषधोपचार व दैनंदिन

"आम्ही निराधार आहोत, घरात कुणी कमावणारे नाही. सरकारने दिलेले मानधनच आमच्या जगण्याचा आधार आहे. पण तेही मिळेनासे झाले. आता घर चालवायचे कसे?" – असा उद्विग्न सवाल एका वृद्ध लाभार्थ्याने केला.

खर्चासाठी पैसे नसल्याने लाभार्थ्यांचे हालअपेष्टा होत आहेत.

याबाबत काही लाभार्थ्यांनी पंचायत समिती व तहसील कार्यालयाकडे वारंवार धाव घेतली. मात्र निधी न मिळाल्याचे सांगून त्यांना थांबवण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. लाभार्थ्यांनी इशारा दिला आहे की, लवकरात लवकर मानधनाचे थकित हप्ते देण्यात आले नाहीत, तर ते रास्ता रोको व आंदोलनाचा मार्ग स्वीकारतील.

स्थानिक सामाजिक संघटनांनी देखील प्रशासनाचे लक्ष वेधून घेत, "निराधारांचे जगणे मानधनावर अवलंबून आहे. शासन व प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ हप्ता वितरित करावा," अशी मागणी केली आहे.

# 13 वी राष्ट्रीय पिंच्याक सिलाट स्पर्धेत अर्णव रावकर रौप्य पदकाचा मानकरी

## कर्नाटक कोप्पल येथे झाली राष्ट्रीय स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

कर्नाटक राज्यातील कोप्पल येथे 26 ते 28 सप्टेंबरमध्ये झालेल्या 13 व्या राष्ट्रीय पिंच्याक सिलाट चषक स्पर्धेत नागोठणे येथील रायगडचे नेतृत्व करणारा अर्णव श्रीकांत रावकर याने उत्कृष्ट कामगिरी करत वजनी गटात रौप्य पदकाचा मानकरी ठरला आहे.

कर्नाटक राज्यातील कोप्पल येथे सप्टेंबरमध्ये झालेल्या राष्ट्रीय पिंच्याक सिलाट चषक स्पर्धेत जम्मू-काश्मीरपासून ते कन्याकुमारी पर्यंतच्या संपूर्ण देशभरातील विविध राज्य व केंद्रशासित प्रदेशांतील अनेक



खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या चषकात प्रि-टीन, प्रि-ज्युनिअर, ज्युनिअर व सीनियर अशा विविध गटांमध्ये सामने घेण्यात आले. प्रत्येक राज्यातून निवड झालेले सर्व खेळाडूने देशभरातील विविध प्रति स्पर्धकासमोर आपली क्रीडा-कौशल्ये दाखवीत होते. यास्पर्धेत रायगडचे नेतृत्व करणारा अर्णव रावकर याने उत्कृष्ट कामगिरी करत वजनी गटात रौप्य पदक पटकावले व रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. यावेळी अर्णव याने माझ्या या यशामागे माझे प्रशिक्षकांसह मला नेहमीच प्रोत्साहन देणारे माझे आजोबा सेवा निवृत्त सैनिक उदंड रावकर तसेच आईवडिलांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले.अर्णव याच्या यशाबद्दल रायगड पिंच्याक सिलाट संघटनेचे अध्यक्ष,सचिव,सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच जिल्ह्यासह राज्यातील विविध स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भाजपा प्रवक्त्याचा जाहीर निषेध भाजपा प्रवक्ते पिन्टु महादेवन यांच्यावर कार्यवाही करण्याची मुखेड तहसीलदार साहेबां कडे मुखेड राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची मागणी




**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

काँग्रेसनेते खा.राहुलजी गांधी यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या केरळ भाजपा प्रवक्ते पिन्टु महादेवन यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी निवेदनाद्वारे मा.तहसीलदार साहेबाकडे मुखेडद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना करण्यात आली आहे

टी.व्ही.वरील मुलाखत देत असताना केरळचे भाजपा प्रवक्ते पिन्टु महादेवन यांनी लोकसभेचे विरोधीपक्ष नेते खा.राहुलजी गांधी यांना गोळ्या घालुन ठार मारण्याची लोकशाहीला विघातक असे वक्तव्य केलेले असुन भाजपा प्रवक्ते महादेवन यांना अटक करून गंभिर कार्यवाही करावी यासाठी नांदेड काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा मा.आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या सुचनेवरून शहर काँग्रेस व काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर यांच्या वतीने निवेदन देऊन बेताल वक्तव्य करणाऱ्या महादेवनचा तिव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड,शहर काँग्रेस अध्यक्ष हणमंत नारनाळीकर,युवक काँग्रेस शहराध्यक्ष जयप्रकाश कानगुले,सोशल मिडीया काँग्रेस शहराध्यक्ष केतन मामडे,काँग्रेस शहर उपाध्यक्ष बालाजी वाडेकर,काँग्रेस शहर उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड तालुका युवक काँग्रेस उपाध्यक्ष एम.आर. गोपणर,मागासवर्गीय काँग्रेस शहराध्यक्ष बालाजी साबणे सह पदाधिकारी उपस्थित होते.

# सुजात आंबेडकरांची पूरग्रस्त भागांची पाहणी; शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीचा घेतला आढावा, दिले मदतीचे आश्वासन



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**

**नांदेड** : वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी आज नांदेड जिल्ह्यातील किरोडी आणि लोहा या पूरग्रस्त भागांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. संपूर्ण महाराष्ट्रातील पूरग्रस्त गावांना ते भेटी देत असून, याच अंतर्गत त्यांनी नांदेडमधील नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांशी संवाद साधला.

पुरामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतल्यानंतर सुजात आंबेडकर यांनी पीडित शेतकरी आणि नागरिकांना वंचित बहुजन आघाडीकडून मदतीचे आश्वासन दिले. "वंचित बहुजन आघाडी शासन स्तरावरून शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेल," असे ते या वेळी म्हणाले.

या पाहणी दौऱ्यात सुजात आंबेडकर यांच्यासोबत वंचित बहुजन आघाडीचे राज्य सदस्य अविनाश भोसीकर, नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष शिवा नारंगले, नांदेडचे जिल्हाध्यक्ष प्रशांत इंगोले तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.